**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे पर्यावरण पुरस्कारासाठी नामांकन अर्ज आमंत्रित

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे दरवर्षी वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जैवविविधता संवर्धन, अपारंपारिक उर्जा स्रोताचा वापर, जनजागृती व पर्यावरण संवर्धन आदी क्षेत्रात पर्यावरणपूरक उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालये, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठान आणि स्वयंसेवी संस्था (गट अ) व व्यक्ती (गट ब) यांना पर्यावरण पुरस्कार प्रदान केल्या जातो. यावर्षी हा पुरस्कार राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिनानिमित्ताने दि. ०२ डिसेंबर, २०२२ रोजी ससन्मान प्रदान करण्यात येईल.

सन २०२२ चा पर्यावरण पुरस्कार प्राप्त करण्यास इच्छूक व्यक्ती/संस्थांसाठी सविस्तर माहिती व आवेदनपत्र विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छुकांनी दि. ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र हार्डकॉपी (५ प्रतीत) विद्यापीठात सादर करावे अशा सूचना विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केल्या असून अधिक माहितीकरीता संबंधितांना विद्यापीठ उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९९२२९११११०१ यावर संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी,
दै. ...................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १७/०६/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/